# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/०६/२०२४ (गुरूवार) दुपार**

## दगडी कोळसा चोरी करणाऱ्या आरोपीतांना कन्हान पोलीसांनी केले अटक

पोस्टे कन्हान अंतर्गत खंडाळा शिवार कन्हान येथे दिनांक २६/०६/२०२४ ते दि. २६/०६/२०२४ चे १३/३० ते १४/५० वा दरम्यान पोस्टे कन्हान येथील स्टाफ हे तपासकामी निलज खंडाळा शिवारात जात असतांना काही इसम आपआपल्या मोटर सायकलवर दगडी कोळसा घेवुन जाताना दिसले. त्यांना पोलीसांनी थांबवुन त्यांना नाव गाव विचारले असता १) मो.सा होन्डा शाईन क्र. एम एच.—३१/एस डब्लु—००२० चा चालक **आरोपी श्रवण सत्यनारायण यादव, वय २४ वर्ष,** २) मो.सा हिरो होन्डा क्र. एम एच ४० यु २८७३ चा चालक **विधीसंर्घ बालक** ३) मोसा सुजुकी क्र. एम एच २९ ए एच २१५ चा चालक आरोपी **मनोन रामबाबु कश्यप, वय २७ वर्ष, तिन्ही रा. खदान नं ६ कन्हान** यांना थांबवुन कोळसा कुठुन आणला याबाबत विचारपुस केली असता इंदर कॉलनी डम्पींग यार्ड येथुन आणल्याने सांगितले. आरोपीतांच्या ताब्यातून १२ बोरी दगडी कोळसा अंदाजे वजन ९०० किलो कोळसा किंमती ४५००/—रू, असा एकुण वाहनासह ६४,५००/— रू मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, ३४ भांदवि अन्वये गुन्हा नोंद असुन आरोपी क्र. १) व ३) यांना अटक केली आहे.

सदरची कारवाई ही, मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक, ना ग्रा, मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोनि उमेश पाटील पोहवा गुरूप्रकाश मेश्राम, पोशि गणपत सायरे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर